# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 15/10/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

प्रत - प्रमुख लिपीक- पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वाचक शाखा (पोअ यवतमाळ.)

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

# निरंक

# भाग २ - रजा

11774

क्रमांक :- पोअय/सआली-1/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/ /2019 यवतमाळ, दिनांक :- 15 OCT 2019.

विषय :- हजर करुन घेणे बाबत

--- 000 ---

**पोन /424 धनश्याम कांबळे नेणमुक पो.मु.यवतमाळ** हे दि. 24/09/2019 ते 15/10/2019 (21दिवस) सिक रजेवर होते. ते दिनांक 15/10/2019 रोजी कर्तव्यावर हजर होणे करीता आले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांचा दिनांक 24/09/2019 ते 15/10/2019 पर्यंतचा सिक कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

24/09/2019 ते 15/10/2019 परावर्तीत रजा 21 दिवस

( अनिलसिंह गौतम )
पोलीस उप अधिक्षक,मुख्यालय
पोलीस अधिक्षक यवतमाळ,करीता.

प्रति,

पोलीस मुख्या.यवतमाळ

प्रत:- वेतन लिपीक 01/डिपीजी लिपीक यांना माहिती योग्य त्या कार्यवाहिस्तव

## भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# निरंक

## भाग ४ - बक्षिस / मानधन

# निरंक

11772

क्रमांक: डिपी/३१-बी-२/पोना-४०६(९७८)मेश्राम (बडतर्फ)/तामील /२०१९ यवतमाळ दिनांक :
15 OCT 2019.

**संदर्भ :-** पो.म.सं/१३/२२/११(मेश्राम-यवतमाळ)/२२६/२०१९ मुंबई
दिनांक ०५/१०/२०१९

**विषय :-** अंतिम आदेश प्रत तामील बाबत.
पोना/४०६(९७८)हरीदास दुर्योधन मेश्राम (बडतर्फ)

***

संदर्भांकित विषयान्वये प्राप्त अंतिम आदेशाची मुळ प्रत पोना/४०६(९७८) हरीदास मेश्राम (बडतर्फ) यांना अदा करण्यात येवुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

**सहपत्र : अंतिम आदेश मुळ व दुय्यम प्रत**

(अनिलसिंह गौतम )
प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

**प्रति,**

पोना/४०६(९७८) हरीदास मेश्राम (बडतर्फ)

**मार्फत :-** राखीव पोलीस निरीक्षक यतमाळ

**प्रत :-** कर्मचारी आस्थापना लिपीक/वेतन लिपीक-१/पेन्शन लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस्तव

**क्रमांक : पोमसं/१३/२२/११(मेश्राम-यवतमाळ)/२२६/२०१९** **मुंबई, दिनांक - ५ /१०/२०१९.**

**वाचा :-** १) नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीची कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे अंतिम आदेश क्र.डिपी/३१-बी/विचौ/अं.आ/पोना-४०६ हरिदास मेश्राम/२६/२०१८, दि.०१/०१/२०१९.

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपिल आदेश क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/ अंआ/ नापोशि-४०६ मेश्राम/३८/२०१९/२७५८, दि.२७/०६/२०१९.

४) माजी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांनी या कार्यालयास उद्देशून केलेला दि.३०/०७/२०१९ चा अपिल अर्ज.

********

**-: दोषारोप :-**

तुम्ही पोना/९७८ हरिदास दुर्योधनजी मेश्राम खालील प्रमाणे नियमबाहय, बेशिस्त व पोलीस दलास न शोभणारे विमार्गगामी वर्तन केले.

१. आपण नागरी हक्क संरक्षण पथक, यवतमाळ येथे कार्यरत असता दि.१०/०२/२०१३ रोजी सेवेचा राजीनामा मिळणेबाबत विनंती अर्ज सादर करुन राजीनामा मंजुर होण्याआधीच पोट निवडणुक २०१३ करीता दि.१४/०५/२०१३ रोजी नामनिर्देशन पत्र भरुन विधानसभा पोटनिवडणुक लढविली आहे.

यावरुन तुम्ही मुंबई पोलीस मॅन्युअल, भाग-१ मधील नियम २५२ चे उल्लंघन केल्याचे सिध्द होते. तुमचे सदरचे वर्तन हे निश्चितच गैरवर्तन आहे.

२. अपिलार्थी माजी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम यांच्यावरील दोषारोप विभागीय चौकशीमध्ये सिध्द् झाल्याने, त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे अंतिम आदेश क्र.डिपी/३१-बी/विचौ/अं.आ/पोना-४०६ हरिदास मेश्राम/२६/२०१८, दिनांक ०१/०१/२०१९ अन्वये **"सेवेतून कादून टाकणे (Remove From service)"** ही शिक्षा दिलेली आहे. सदर शिक्षेविरुध्द अपिलार्थी यांनी अपिल अर्ज सादर केला असता, अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपिल आदेश क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/अंआ/नापोशि-४०६ मेश्राम/३८/२०१९/२७५८, दि.२७/०६/२०१९ अन्वये पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली शिक्षा अपिलामध्ये कायम केलेली आहे. सदर शिक्षेने व्यथित होवून अपिलार्थी यांनी या कार्यालयास दि.३०/०७/२०१९ अन्वये विहीत मुदतीत अपिल अर्ज सादर केलेला आहे.

## -: अपिलार्थी यांचे विवेचन :-

३. अपिलार्थी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम यांनी त्यांच्या दिनांक दि.३०/०७/२०१९ च्या फेर अपिल अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,

(१)विभागीय चौकशीमध्ये कोणतेही ओदश पारीत करतांना बोलका आदेश परीत करणे आवश्यक आहे परंतु तसे करण्यात आलेले नाही.

(२)अपिलार्थी यांना समाजसेवेची आवड असल्यामुळे ते सन २०१३ च्या यवतमाळ विधानसभा मतदार संघातून उमेदवार म्हणून पोट निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. परंतु ते पोलीस विभागात कार्यरत असल्याने त्यांना म.पो.मॅ., भाग-१ चे नियम क्र.३८८ (४) मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणे शक्य नाही या नियमाची त्यांना जाणीव असल्याने व त्यांची पोलीस विभागाम २२ वर्षे सेवा पुर्ण झाल्याने त्यांनी त्यांचे नियुक्ती विषयक सक्षम प्राधिकारी यांना दि.१०/०२/२०१३ रोजी म.ना.से. (सेवानिवृत्ती) नियम १९८२ चे नियम क्र.६६ अन्वये स्वेच्छेने सेवा निवृत्तीचा अर्ज सादर केलेला आहे. तसेचा सदरचा अर्ज हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना त्याच दिवशी म्हणजेच दि.१०/०२/२०१३ रोजी प्राप्त झाल्याबद्दल स्वाक्षरी व शिक्का आहे.

(३)अपिलार्थी यांना यवतमाळ मतदार संघातून दि.१४/०५/२०१३ रोजी नामनिर्देशन पत्र भरावयाचे होते तो पर्यत त्यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडून अपिलार्थी यांना स्वेच्छा निवृत्ती अर्ज मंजूर केला किंवा नामंजूर केला असे कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे स्थानिक वकील यांचेकडून सल्ला घेतला असता, त्यांनी ३ महिने पुर्वीच अर्ज दिला असल्याने या काळात त्यांचा अर्ज नाकारणे किंवा मान्य केल्याबाबत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने ते दिनांक ११/०५/२०१३ पासून पोलीस सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत असे सांगितले. तसेच त्यांनी म.ना.से (सेवानिवृत्ती) नियम १९८२ मधील नियम क्र.६६ मधील तरतुदी दाखविल्या त्यावरुन त्यांना सेवानिवृत्त होवून ३ दिवस झाले नंतर त्यांनी नामनिर्देशन पत्र भरले आहे. अशा परिस्थीतील सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी आदेशीत केलेली आहे.

(४)सदरची निवडणूक पूर्ण झाल्यावर ते तीस-या क्रमांकावर राहून अपयशी झाले व काहीतरी व्यवसाय करुन समाजसेवा करण्याचा निर्णय घेतला.

(५) तद्नंतर अपिलार्थी यांना नोकरीवर हजर होण्याची सूचना मिळाल्याने ते पेन्शन पेपर तयार करण्याकरीता कार्यालयात गेले. परंतु त्यांच्याकडे सेवानिवृत्तीचे आदेश नसल्याने त्यांना कर्तव्यावहर हजर व्हा असे सांगण्यात आले. तसेच त्यांना १४५ म.पोलीस अधिनियमाचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली असता, नाईलाजास्तवर कर्तव्यावर हजर झाले. त्यानंतर विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली. अपिलार्थी यांच्यावर लादण्यात आलेल्या दोषारोपापूर्वीच ते सेवानिवृत्ती झालेले

असल्याने त्यांनी त्यांना विभागीय चौकशी चालवायची नाही असे सांगितले.

(६) अपिलार्थी हे दि.११/०५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्या दिनांकापासून त्यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण तयार करुन मा. महालेखाकार द्वितीय नागपूर यांचेकडे पाठविण्याचे आदेश होणेस विनंती केली आहे.

(७)अपिलार्थी यांनी पोलीस विभागाम २२ वर्षे सेवा केलेली आहे. त्यांनतर जबरदस्ती ६ वर्षे सेवा करुन घेण्यात आलेली आहे. सदरची बाब त्यांनी वरिष्ठांचे निदर्शनास आणून दिली असता, तुम तुम्हारा काम करो हमको मत शिखाओ असे सांगण्यात आले.

(८)अपिलार्थी यांचे सेवाकालावधी त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय किंवा फौजदारी कार्यवाही केलेली नाही. तसेच त्यांना कोणतीही शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही.

४. अपिलार्थी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांच्या फेर अपिल अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या अपिल अर्जावर अंतिम निर्णय घेण्यापुर्वी त्यांना आज्ञांकित कक्षात वैयक्तीक सुनावणीसाठी दि.२७/०९/२०१९ रोजी ११.०० सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यानुसार ते दि.२७/०९/२०१९ रोजी आज्ञांकित कक्षात वैयक्तिक सुनावणीसाठी हजर झाले होते.

**(अ)अपिलार्थी यांनी मुलाखतीच्यावेळी कथन केले की,** अपिलार्थी यांची १० वर्षे सेवा राहिलेली असून, त्यांची मुले उच्च शिक्षण घेत आहेत, तरी त्यांना देण्यात आलेली शिक्षा एकदा रद्द होवून सेवेत पुन: घेण्याची विंनती केली आहे.

**-: निष्कर्ष :-**

५. **एकंदरीत** अपिलार्थी यांनी अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे, त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेली निराकरण टिप्पणी, विभागीय चौकशीची कागदपत्रे, आज्ञांकित कक्षात केलेले कथन इत्यादींचे बारकाईन अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा राजीनामा मंजूर होण्यापुर्वीच म्हणजेच शासकीय सेवेत असतांना विधानसभा निवडणुक - २०१३ लढविल्याचे विभागीय चौकशीमध्ये सिध्द झाले आहे. तसेच अपिलार्थी यांनी सदरचा दोषारोप मान्य केला आहे. यास्तव त्यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा अधीक्षक, यवतमाळ यांनी दि.०१/०१/२०१९ च्या अंतिम आदेशान्वये दिलेली तसेच अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे दि.२७/०६/२०१९ अपिल आदेशामध्ये कायम केलेली **"सेवेतून काढून टाकणे (Remove From service)"** ही शिक्षा कसूरीच्या मानाने योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

**-: फेर अपिल आदेश :-**

६. मी, संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई या आदेशाव्दारे माजी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम, नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचा फेर अपिल अर्ज फेटाळत आहे.

७. अपिलार्थी माजी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम यांनी अपिलाच्या दोन संधी उपभोगलेल्या असल्याने त्यांना सदर आदेशाविरुध्द शासनाकडे अपिल अनुज्ञेय नाही.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**
**माजी नापोशि.४०६(९७८)/हरिदास दुर्योधनजी मेश्राम,**
**नेम. पोलीस मुख्यालय, यवतमाळ**
**(मार्फत- पोलीस अधीक्षक, यवतमाळ)**

## भाग ६ - प्रशिक्षण व इतर

**निरंक**

## समाप्त